सद्रक्षणाय खलनिग्रहणाय्
दूरध्वनी क्र. ०२२-२२६२०३३२
Email:pressroom.mum@mahapolice.gov.in

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
वार्ताहर कक्ष
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. १२६/ वार्ता.कक्ष /२०२२ दिनांक : ३०/ ०५ / २०२२

# -: प्रेसनोट :-

दिनांक ३०/०५/२०२२ रोजी ११:०० वाजता प्रेरणा हॉल, आझाद मैदान, मुंबई बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयातील ०५ प्रादेशिक विभागामधुन प्रत्येकी २ संघ असे एकुण १० संघ (३ विदयार्थ्यांचा १ संघ असे एकुण ३० विदयार्थ्यी) प्रत्येक विदयार्थी ०३ मिनीटांमध्ये सन २०३० मध्ये तो सामान्य नागरीक, प्रशासकिय अधिकारी तसेच राजकारणातील राजकिय नेता म्हणुन तो मुंबईला कशा प्रकारे आदर्श शहर बनविण्याचा प्रयत्न करील व तरूणांचा सन २०३० मधील आदर्श मुंबई शहरासाठी दृष्टीकोन कसा असेल हे जाणुन घेण्यासाठी मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांचे संकल्पनेतून सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सदर स्पर्धेचा पारीतोषिक वितरण कार्यक्रम दि.३०/०५/२०२२ रोजी १५:०० वाजता यशवंतराव चव्हाण सेंटर, जनरल जगन्नाथ थोसले मार्ग, मंत्रालय समोर, नरीमन पॉईंट, मुबई याठिकाणी मा.पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्या हस्ते आयोजित करण्यात आला होता.

सदर स्पर्धेत प्रथम पारितोषिक पश्चिम प्रादेशिक विभागातील भक्ती वेदांत स्वामी मिशन स्कुल, आंबोली, मुंबईचे विदयार्थी नित्यांनंद उपाध्याय, कु. रिदधीमा चतुर्वेदी व कु. इरा गुप्ता यांनी पटकावले. व्दितीय पारितोषिक उत्तर प्रादेशिक विभागातील शैलेंद्र इज्युकेशन सोसायटी, शैलेंद्र नगर, दहिसर ईस्ट, मुंबईचे विदयार्थी वल्लभ मयुर बोरकर, कु. प्रांजली दिपक कदम, आयुष महेश जाधव यांनी पटकावले तसेच तृतिय पारितोषिक मध्य प्रादेशिक विभागातील राम नारायण रुयिया महाविदयालय, माटुंगा, मुंबईचे विदयार्थी कु. सिदधी नागेश मयेकर, कु. साक्षी सोमनाथ ताडगे, कु. भक्ती राजेंद्र मुळे यांनी पटकावले. तसेच सदर स्पर्धेत ३५ वर्षा पर्यंत वैयक्तिक नागरीकांना स्वतंत्र संधी देण्यात आली होती असे २०० नागरीकांनी सहभाग घेतला होता व त्यांची परिमंडळ/प्रादेशिक विभाग स्तरावरून चाचणी होवुन अंतिम स्पर्धेमध्ये नागरीकांची निवड करण्यात आली आहे. त्यामध्ये वैयक्तीक गटामध्ये प्रथम पारितोषिक पुर्वप्रादेशिक विभागातील कु. कोमल तुषार तोतरे, पी.व्ही.जी. विदयाभवन शाळा, घाटकोपर, मुंबई हीने पटकावला.

सदर स्पर्धेकरीता निष्पक्ष ज्युडी सदस्य म्हणुन १) श्री. श्रीकृष्ण कोकाटे पोलीस उप आयुक्त सशस्त्र विभाग -२, ताडदेव, मुंबई २) डॉ. वसंत बी. हेलावी रेडडी, प्राचार्य, एलफिस्टन महाविदयालय, फोर्ट, मुंबई ३) श्री. मारीओ फिशेरी संचालक- तंत्रज्ञान विभाग, अमेरिकन स्कूल, मुंबई हे उपस्थित होते.

सदर कार्यक्रमास मा. संजय पांडे, पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई, मा. विश्वास नांगरे पाटील, पोलीस सह आयुक्त, कायदा व सुव्यवस्था, बृहन्मुंबई, श्री. झोहेर दिवान, अध्यक्ष - सिटीझन फोरम, श्रीमती वर्षा विदया विलास - - सिटीझन फोरम तसेच मुंबईतील विविध महाविदयालय व शाळा यांचे प्राचार्य, मुख्यध्यापक आणि विदयार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

**(संजय लाटकर)**
पोलीस उप आयुक्त (अभियान),
जनसंपर्क अधिकारी,
पोलीस आयुक्त कार्यालय, मुंबई